**चरित्र** **2**

**मातृभूमीशी पुन्हा जोडून घेण्याचा प्रयत्न** **2**

**लोहियांनी भारतीय समाजवादी राजकारणाला दिलेले योगदान** **4**

**समाजवादाची नवी व्याख्या** **5**

**सप्त क्रांती** **6**

स्त्री-पुरुष भेद 6

वर्णद्वेषा विरूद्धची क्रांती 7

लोहीयांचे जातीव्यवस्थेसंबंधीचे विचार 7

राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीची चळवळ 8

आर्थिक समानता, भांडवलवाद 8

व्यक्ती स्वातंत्र्य जपण्यासाठीची क्रांती 10

शस्त्रास्त्रांच्या वाढीविरोधात क्रांती 11

**भाषा** **11**

**जमातवाद** **11**

# चरित्र

जन्म- २३ मार्च १९१०, अकबरपूर, आयोध्येजवळ, उत्तरप्रदेश
मृत्यू- १२ ऑक्टोबर १९६७ - (५७ वर्षे) दिल्ली, विलिंग्डन हॉस्पीटल - लोहीयांच्या मृत्यूनंतर या हॉस्पीटलला राम मनोहर लोहीया हॉस्पीटल हे नाव देण्यात आले.

श्रीमंत मारवाडी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. (वैश्य, अग्रवाल). त्यांचे वडील स्वातंत्र्य सैनिक होते. पुराणातील रामाचे जन्मस्थान असलेल्या आयोध्ये जवळ लोहीयांचा जन्म झाला. तेथील जीवन महाकाव्यातील या व्यक्तिमत्वाच्या कथांभोवती गुंफले गेले होते. लोहीयांचे प्राथमिक शिक्षण मुंबई आणि कलकत्यामध्ये झाले. बनारस विद्यापीठातून त्यांनी पदवी संपादन केली. ऐतिहासिक संतकवी राईदास, कबीर आणि रामचरित मानसाचे लेखक तुलसी यांचाही त्यांनी अभ्यास केला.

1930-32 च्या दरम्यान महात्मा गांधींच्या सत्याग्रह चळवळीमध्ये त्यांना तुरुंगात जावे लागले होते. याच काळात बर्लीनमध्ये हमबोल्ट विदयापीठात (ज्याला त्यावेळी फ्रेडरीक विलहेल्म विद्यापीठ म्हणत होते) राष्ट्रीय अर्थशास्त्रावर त्यांनी आपला पी. एच. डी. चा प्रबंध पूर्ण केला. जर्मनीची निवड त्यांनी जाणिवपूर्वक केली होती. त्याकाळी वसाहतवादी प्रशासनात एखादे पद मिळविण्याची इच्छा असलेले बहुतेक भारतीय ब्रिटनमधील विद्यापीठांची निवड करीत होते. लोहीयांची तशी कोणतीच इच्छा नव्हती. गांधींनी ज्या मुद्द्यावर आपली दांडी यात्रा काढली, तोच भारतातील मीठावरील कराचा मुद्दा त्यांच्या संशोधनात्मक प्रबंधाचा विषय होता ही महत्वपूर्ण बाब आहे. जर्मनीतील वास्तव्याने प्रत्येक कृतीला सैद्धांतीक आधार शोधण्याच्या लोहीयांच्या मूळ प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळाले असेल.

हिंदी ही त्यांची मातृभाषा, त्यांना हिंदीचा प्रचंड अभिमान होता आणि हिंदी सर्व भारतीयांनी आपली मानावी हा त्यांचा काही प्रमाणात आग्रह होता. त्याशिवाय त्यांचे इंग्रजी, जर्मन या भाषांवर प्रभुत्व होते.

लहानपणापासून स्वातंत्र्य चळवळीचा आणि गांधींच्या विचारांचा प्रभाव. लहानपणीच गांधींच्या चळवळीकडे आकर्षिले गेले. तरूणपणी हा प्रभाव कायम टिकला आणि वाढला. पुढे ते पूर्णवेळ राजकीय कार्यकर्ते झाले. त्यांना स्वातंत्र्य चळवळी दरम्यान अनेकवेळा तुरुंगात जावे लागले. प्रथम महात्मा गांधी आणि नंतर महाविद्यालयीन काळात कार्ल मार्क्स, पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता.

शिक्षण पूर्ण झाल्यावर ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पूर्णवेळ काम करू लागले. आचार्य नरेंद्र देव, जय प्रकाश नारायण यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. १९३४ मध्ये जेव्हा काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली तेव्हा ते त्यामध्ये सामील झाले. या गटातील लोकांनी स्वातंत्र्यानंतर काँग्रेसमधून बाहेर पडून भारतीय समाजवादी पक्षाची स्थापना केली. लोहीया ह्या सर्व घडामोडींमध्ये आघाडीवर होते. भारतीय समाजवादी पक्षामध्ये फूट पडून पुढे प्रजा समाजवादी पक्षाची स्थापना झाली. लोहीया या पक्षाचे सर्वात मोठे नेते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला पर्याय देण्याचे राजकारण सुरु झाले. १९६६ मध्ये या राजकारणाला काही प्रमाणात यश मिळाले आणि १९६७ मध्ये लोहीयांचा मृत्यू झाला.

# मातृभूमीशी पुन्हा जोडून घेण्याचा प्रयत्न

भारतीय राजकारणाच्या विविध पैलूंना लोहीयांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. भारतावरील अमर्याद प्रेम ही त्यांच्या व्यक्तीमत्वाची मूलभूत प्रेरणा होती. भारतासाठी कोणत्याही प्रकारच्या यातना आणि अपमान सहन करण्याची त्यांची तयारी होती. चलेजाव चळवळीमध्ये भूमीगत संघर्षाचे नेतृत्व करण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना अटक झाली होती आणि लाहोरच्या कुप्रसिद्ध किल्ल्यामध्ये चार आठवडे त्यांचा छळ करण्यात आला होता.

त्यांच्यासाठी भारत म्हणजे केवळ भौगोलिक सीमांनी निश्चित केलेली राजकीय व्यवस्था नव्हती. त्यांच्यासाठी भारत म्हणजे एक सांस्कृतिक आणि अध्यात्मिक जाणीव होती. या जाणिवेने ते भारावून गेले होते. ते जेव्हा भारताच्या इतिहासाचा विचार

करीत तेव्हा त्यांच्या समोर उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिमेकडचे विविध रंगांचे विविध वेष परिधान केलेले आणि विविध नृत्यांमध्ये मग्न लोक येत असत. या साऱ्यांच्या मिश्रणातून तयार झालेली एकसंध आणि समृद्धी संस्कृती त्यांना अग्नेय आशियाच्या त्यांच्या दौऱ्यांमध्येही जाणवत असे.

त्यांना भारताच्या सीमांमध्ये झालेली घुसखोरी अजिबात सहन होत नसे. त्यांनी गोव्यामध्ये पोर्तुगीजांना विरोध केला आणि त्यांना अटक झाली. नेफा - (North Eastern Frontier Province - NEFA - ज्याला आज अरुणाचल प्रदेश म्हणतात, आणि ज्याला लोहीया युवाशिवम म्हणत), भागातील भारतीयांच्या हालचालींवर असलेली बंधने त्यांनी झुगारुन दिली आणि त्यांना अटक झाली.

नेहरु सरकारने जेव्हा मानसरोवर आणि कैलाससहीत तिबेटवरील चीनचा हक्क मान्य केला तेव्हा ते अत्यंत दुःखी झाले. पुराणांमध्ये कैलासाला शिवाचे घर मानले जाते. चीनने लडाखचा काही भाग ताब्यात घेतला. गवताचे पातेही जिथे उगवत नाही असा नापिक भूभाग असे नेहरूंनी लडाखच्या त्या भागाचे वर्णन केले. हे ऐकून लोहीयांना खूप अनादर झाल्यासारखे वाटले. लोहीयांच्या मते असे बोलणे म्हणजे मातृभूमीला बदनाम करण्यासारखे होते.

गंगा, गोदावरी आणि नर्मदा या देशातील महान नद्या कारखान्यांनी सोडलेली रसायने आणि शहरांच्या गटारांमुळे प्रदूषित झाल्या आहेत हे कळल्यानंतर त्यांना प्रचंड मनस्ताप झाला. 1962 मध्ये चीनने भारताच्या बऱ्याच मोठ्या भागावर ताबा मिळवला आणि त्यानंतर पंतप्रधान नेहरू आकाशवाणीवरून रडले असे ऐकल्यावर त्यांना मोठा धक्का बसला. त्यावेळी त्यांना जर्मनीने दुसऱ्यामहायुद्धाच्या सुरवातीला डंकीर्क ताब्यात घेतल्यानंतर विन्स्टन चर्चिलने दिलेले भाषण आठवले आणि त्या दोन्ही प्रसंगातला फरकही जाणवला. चर्चिलच्या या भाषणामुळे जर्मनांशी शेवटपर्यंत लढा देण्याचा ब्रिटीशांचा निर्धार पक्का झाला. या अपमानामुळे लोहीयांना हिमालय बचाव मोहीम सुरु करण्याची प्रेरणा मिळाली. तिबेटची स्वायत्तता परत मिळवणे हे या हिमालय बचाव मोहीमेचे एक उद्दीष्ट होते.

सिक्कीम हा भारताचा भाग आहे असा त्यांचा विश्वास होता, तो नंतर खरा ठरला.

राम, कृष्ण आणि शिव या त्यांच्या मूळातच सुंदर साहित्यिक नमुना असलेल्या लेखात त्यांनी भारताला एकत्र बांधणाऱ्या प्रेरणांची चर्चा केली आहे. रामायणामध्ये उत्तर आणि दक्षिणेची एकता साधली आहे तर कृष्ण पूर्व आणि पश्चिमेच्या एकात्मतेचे प्रतिनिधीत्व करतो असे त्यांना वाटत होते. राम आणि कृष्णाचे सद्गुण त्यांना त्यांच्या एक महान समकालीन व्यक्तिमत्वामध्ये म्हणजेच गांधींमध्ये दिसले.

ते म्हणतात गांधी हे रामाचे महान वंशज होते. मरताना त्यांच्या ओठावर रामाचे नाव होते. त्यांनी त्यांचे आयुष्य त्या महान आदर्शाप्रमाणे घडविण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या देशबांधवांना अनुकरण करण्यास आंमंत्रित केले. पण त्यांच्यावर कृष्णाचा प्रचंड प्रभाव होता. दर दिवशी किंवा दर आठवड्याला त्यांनी लिहीलेली पत्रे, त्यांची भाषणे आणि त्यांनी केलेले इतर लिखाण सुसंगत वाटते. पण त्यांच्या मृत्यूनंतर ते सगळे एकत्रित वाचल्यास गांधींचे चातुर्य आणि कौशल्य, त्यांच्या बदलत्या भूमिका हे सर्व लक्षात घेऊन आश्चर्यचकीत व्हायला होते.

आणि शेवटी त्यांनी एक प्रार्थना लिहीली आहे. ती प्रार्थना आपल्या महाकाव्यातील महानायकांच्या परंपरेमध्ये बसणारी आहे. लोहीया लिहीतात, “ हे भारतमाते, आम्हाला शिवाचे मन दे, कृष्णाचे ह्रदय दे आणि रामाचे शब्द आणि कृती दे. आमचे चित्त एकाग्र कर, आमचे ह्रदय उत्साहाने भरलेले असो परंतु आमचे आयुष्य मात्र मर्यादांमध्येच असो.”

कला आणि शिल्पकृतींमध्ये त्यांनी भारताची एकता शोधण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये त्यांना असे दिसून आले की वायव्येकडील ( गांधारकला – यामध्ये काही प्रमाणात ग्रीक प्रभाव जाणवत होता. ) काही कला सोडल्यास सर्वांचे मूळ सारखेच आहे. त्यांनी विविध भारतीय भाषांसाठी समान लिपी शोधण्याचा प्रयत्न केला. मल्याळम, तेलूगु, ओरिया आणि देवनागरी लिपीमध्ये बराच सारखेपणा आहे हे त्यांच्या लक्षात आले. कलेच्या क्षेत्रामध्ये त्यांचा प्रभाव विशिष्ठ संकल्पनांपुरता मर्यादीत होता. त्यांनी एम. एफ. हुसेन यांना भारतीय महाकाव्यातील प्रतिमा रंगविण्यास सांगितले. हुसेन यांनी त्यांचा सल्ला मानला

लोहीयांनी बरेच लिखाण, मनन, चिंतन केले आहे. त्यांची बहुतेक पुस्तके त्यांच्या अनुयायांनी त्यांची भाषणे, लेख एकत्र करून छापलेली आहेत. त्यांची काही पुस्तकेः-

1. मार्क्स, गांधी आणि समाजवाद
2. व्हील ऑफ हिस्टरी
3. गिल्टी मेन ऑफ इंडियाज पार्टीशन - भारत-पाकिस्तान फाळणी संदर्भातील विवेचन
4. हिंदू बनाम हिंदू - जमातवादी राजकारणासंबंधीचे पुस्तक
5. आंतरराष्ट्रीय राजकारण - विशेषतः चीन संबंधीचे त्यांचे पुस्तक - इंडिया, चायना अँन्ड नॉर्दर्न फ्राँटीयर्स
6. इकॉनॉमिक्स आफ्टर मार्क्स - अर्थकारण आणि आर्थिक नियोजनासंबंधीचे पुस्तक

एक दुर्लक्षित आणि उपेक्षित नेतृत्व, त्यांचे विचार प्रत्यक्षात आणण्याची संधी, म्हणजे प्रत्यक्ष राजकीय सत्ता, त्यांना क्वचितच मिळाली नाही. पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे ते समकालीन. त्यांची नेहमी नेहरूंबरोबर तुलना होत राहीली आणि त्यामध्ये सत्ताधारी असल्यामुळे नेहरुंचा प्रभाव अधिक राहीला. त्यांच्या अपयशाला काही प्रमाणात समाजवाद्यांचे फाटाफुटीचे राजकारण कारणीभूत ठरले.

भारतीय इतिहासाचा क्रम आणि विचार पद्धती यावर ज्या नेत्यांचा प्रभाव आहे अशांमध्ये राम मनोहर लोहीया हे एक अद्वितीय व्यक्तीमत्व होते. राजकारणाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन व्यापक, जागतिक होता. त्या दृष्टीकोनाच्या आधारे त्यांनी स्वतःसाठी आदर्श तयार केले होते. त्यानुसार त्यांचे राजकारण चालत होते.

हिंदी आणि इतर भारतीय भाषांमधील अनेक लेखक आणि कवी लोहीयांचे चाहते आणि शिष्य होते. यु. आर. अनंतमूर्ती, रमेशचंद्र शहा आणि कमलेश हे त्यांच्या जवळचे होते, आजही हयात आहेत. लोहीयांचा प्रभाव त्यांच्यावर कसा होता ते कदाचित आपल्याला सांगू शकतील त्यामुळे कदाचीत लोहीयांचे जगाला माहीत नसलेले व्यक्तीमत्वाचे पैलू जगासमोर येतील.

लोहीया समाजवादी होते आणि समानतेचे पुरस्कर्ते होते. परंतु देशभक्त असल्यामुळे त्यांच्या समानतेच्या संकल्पनेला एक वेगळा भारतीय स्वाद होता. समानता किंवा समत्व भाव याचा भारतीय परंपरेमधील अर्थ पश्चिमेकडील परंपरेच्या अर्थाच्या बराच पलीकडे जातो. पश्चिमेकडे समानता म्हणजे खरेदीक्षमतेच्या संदर्भात आर्थिक स्थिती उंचावून किंवा खालावून समपातळीवर आणणे. या उलट समत्व या संकल्पनेला न्याय आणि परस्परसंबंधांच्या संदर्भात आध्यात्मिक आणि बौद्धीक पातळीवर खोल अर्थ आहे. परंतु भारतीय समाजाच्या विविध रुपांमध्ये छुप्या स्वरुपात असलेल्या एका मोठ्या धोक्याची त्यांना जाणिव होती. जात आणि लिंगाच्या आधारावर होणारा भेदभाव हा तो धोका होता.

### “लोग मेरी बात सुनेंगे जरूर, लेकीन मेरे मरने के बाद"

अनेकवेळा संदर्भासाठी वापरल्या गेलेल्या लोहियांच्या या वाक्यातून काय व्यक्त होते...भविष्याचा अंदाज, दुर्दम्य आशावाद की घोर निराशा ? हे वाक्य वरील सर्वच अर्थ व्यक्त करते. ते लोहिया यांचे त्यांच्या काळाशी असलेले नाते स्पष्ट करणारे आहे. लोहिया यांची त्यांच्या काळाशी तार जुळलेली नव्हती. त्यांच्या अनेक कल्पना त्या काळापेक्षा अधिक प्रागतिक होत्या. त्यामुळेच त्यांना समजून घेण्यात अनेकांची चूक झाली.

## लोहियांनी भारतीय समाजवादी राजकारणाला दिलेले योगदान

भारतातील समाजवादी विचारांच्या विकासाला लोहीयांनी दिलेले योगदान मोठे आहे. रशिया किंवा पश्चिमेचे समाजवादी मॉडेल नाकारणारे ते पहिले भारतीय समाजवादी होते. भारतीय परिस्थितीच्या संदर्भात त्यांनी समाजवादी विचार मांडले. केवळ पाश्चिमात्यांचे अनुकरण केले नाही. ते काँग्रेस समाजवादी पक्षाच्या संस्थापकांपैकी एक होते आणि त्यांनी ‘काँग्रेस सोशॅलिस्ट’ या मासिकाचे काही वर्षे संपादनही केले. आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता अशा दिग्गज समाजवाद्यांच्या बरोबर त्यांच्या समाजवादी विचारांचा विकास झाला. यापैकी प्रत्येक समाजवाद्याने आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर समाजवादाचा मार्ग सोडला

त्यांच्यासाठी व्यक्तीचे स्वातंत्र्य ही सर्वात मोठी बाब होती. त्याच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीविरुद्ध त्यांनी नेहमीच बंड पुकारले. त्यांच्यासाठी स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य असा मर्यादीत अर्थ नव्हता. स्वातंत्र्य म्हणजे गुलामगिरीची मानसिकता बदलणे आणि पश्चिमेचे अंधानुकरण थांबवणे.

राम मनोहर लोहीया यांचा भारतीय राजकारणात प्रवेश होण्यापूर्वी समाजवादी चळवळीत मार्क्सवादी विचारांचा आणि तात्विक संकल्पनांच्या चर्चेचा प्रचंड प्रभाव होता. साम्यवादी आणि समाजवादी म्हणजे गूढ, न समजणारे, ज्याचा वास्तवाशी काही संबंध नाही, असे काहीतरी बडबडणारे असा सामान्य लोकांचा समज होता. याउलट, राजकारण म्हणजे केवळ अमूर्त संकल्पनांची आणि विचारप्रणालींची चर्चा करणे नव्हे, राजकारणाला सामाजिक प्रश्न आणि दैनंदीन परिस्थितीशी सामना करावा लागतो, असे लोहीयांचे स्पष्ट मत होते. लोहीयांनी समाजवादी राजकारण सामान्य लोकांना समजेल अशा भाषेत मांडायला सुरवात केली.

देशाच्या प्रत्यक्ष स्थितीच्या ऐवजी गर्व किंवा अहंभावाच्या आधाराने एखाद्या देशाचे वर्णन करणे पूर्णपणे चूकीचे आहे. कोट्यवधी लोकांना उपलब्ध असलेल्या अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षणाचा दर्जा, त्यांची भौतिक समृद्धी या सारख्या वास्तविक निकषांच्या आधारेच एखाद्या देशाच्या नेमक्या स्थितीसंबंधी अंदाज बांधला पाहिजे. तोच लोहीयांच्या चिंतनाचा मुख्य विषय होता. त्यामुळेच त्यांना मार्क्स, गांधी आणि समाजवाद या विचारांचा परामर्श घ्यावासा वाटला आणि त्यातूनच त्यांना सप्त क्रांतीची संकल्पना सुचली.

## समाजवादाची नवी व्याख्या

लोहीया जर्मनी मध्ये लोकशाही समाजवादी झाले असे लोहीयांच्या समकालीन आणि त्यांच्या चरित्रकार इंदुमती केळकर आपल्याला सांगतात. 1933 साली भारतात परत आल्या नंतर 1934 साली निर्माण झालेल्या काँग्रेस समाजवादी पक्षाच्या अनेक नेत्यांपैकी ते एक नेते बनले. स्वातंत्र्य चळवळीमधील दीर्घकालीन उमेदवारी, आणि समाजवादी चळवळ उभारण्यासाठी झालेले संघटनात्मक संघर्ष, (ज्या चळवळीचे शेवटी तेच एकटे नेते म्हणून शिल्लक राहीले) यासर्वांमधून त्यांनी त्यांचे समाजवादासंबंधीचे विचार विकसित केले.

एकेकाळी सर्वाधिक प्रभावी असलेले भारतीय समाजवादी नेते जयप्रकाश नारायण राजकारण सोडून भूदान चळवळीमध्ये सहभागी झाले. अच्युत पटवर्धन आणि रामनंदन मिश्रा अध्यात्मिक शोधांकडे वळले. अशोक मेहता काँग्रेसमध्ये सामील झाले आणि महान बुद्धीवादी आचार्य नरेंद्र देव 1955 मध्ये वारले. समाजवादी चळवळीसाठी हा अत्यंत कठीण काळ होता. लोहीयांनी ही पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न केला.

जवाहरलाल नेहरूंनी राजकीय क्षेत्रावर आपली मक्तेदारी स्थापित करण्याचा प्रयत्न केल्यामुळे लोहीयांची वाट अधिक बिकट झाली. नेहरु सत्ताधारी पक्षाचे नेते होते तरी त्यांनी विरोधकांनाही आपल्या पालकत्वाच्या धाकात ठेवण्याचा प्रयत्न केला. नेहरूंच्या प्रभावाला दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्यामुळे लोहीयांची प्रमाणाबाहेर कठोर प्रतिमा निर्माण झाली. समाजवादी चळवळीची वेगळी ओळख टिकवून ठेवण्यासाठी ती प्रतिमा तशी असणे गरजेचेही होते. पण या सगळ्याप्रकारांमुळे समाजवादी चळवळीला एक वेगळे महत्व प्राप्त झाले. सत्तेच्या राजकारणातील केवळ एक वेगळा पर्याय यापेक्षा ते कितीतरी व्यापक आणि महत्वाचे होते. स्वतःला त्यांचे अनुयायी म्हणविणारे आजचे राजकारणी कीव करावीशी वाटेल असे राजकीय खेळ खेळत आहेत.

समानता आणि लोकांची समृद्धी असा लोहीयांसाठी समाजवादाचा साधा सोपा अर्थ होता. या दोन्ही आदर्शांना एकत्र कसे आणायचे हा प्रश्न त्यांना सतत सतावत होता. त्यांच्या अनुभवाप्रमाणे टोकाचे दारिद्र्य आणि टोकाची समृद्धी या दोन गोष्टी ज्या एका समान पातळीवर आणाव्या लागतील ती पातळी एकाच समाजव्यवस्थेचे वैशिष्ट्य नव्हती. ही विभागणी एका भडक स्वरुपात आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये निर्माण झाली आहे. युरोप आणि अमेरिकेतील गोऱ्या लोकांकडे सर्व संपत्ती आणि प्रचंड उत्पादन क्षमता आहे. इतर जग मात्र दारिद्र्यात अडकून पडले आहे. कमी उत्पादन क्षमता आणि कमी उत्पन्न या दुष्टचक्रात सापडले आहे. समतेचा प्रश्न केवळ एका देशातील लोकांपुरता मर्यादीत राहीला नाही. काळे, गव्हाळ रंगाचे आणि गोरे यांच्यामधील समानतेचा प्रश्नही निर्माण झाला. त्यामध्ये जात आणि लिंग यांच्यामधील फरकाच्या प्रश्नाची भर पडली आहे.

संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संघटनेमध्ये बहुतेक राष्ट्रांना सुरक्षा परिषदेपासून लांब ठेवण्यात आले. सुरक्षा परिषदेमध्येही महासत्ता होत्या. त्यांना बहुसंख्येने घेतलेल्या निर्णयांविरुद्ध नकाराधिकार वापरून ते निर्णय रद्द ठरविण्याचा अधिकार देण्यात आला. हा दृष्टीकोन पुढे रेटला गेला, त्याचा इतर क्षेत्रात विस्तार होत गेला. तिथे असमानतेची नवी रुपे उदयाला आली. यातील एक प्रकार अलीकडे सुस्पष्ट होत चालला आहे.

जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांनी सर्व राष्ट्रांचे आर्थिक हीतसंबंध जोपासावेत अशी अपेक्षा आहे परंतु प्रत्यक्षात या संस्था म्हणजे अमेरिका आणि समृद्ध युरोपीय राष्ट्रांचे आणि त्या राष्ट्रांच्या प्रभुत्वा खाली असलेले विशेष संघ आहेत. ही विचारधारा आंतरराष्ट्रीय संबंधांची पुनर्ररचना करण्याचे नवे मार्ग खुले करेल. त्यामुळे सध्याच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये खोलवर रुजलेल्या पदसोपान व्यवस्थांचा अंत होईल. त्यामुळे शेवटी जग अधिक मुक्त होईल, लोकांना त्यामध्ये अधिक मुक्त संचार करता येईल. पासपोर्ट आणि व्हीसा विरहीत जग या लोहीयांच्या स्वप्नाच्या कदाचित आपण अधिक जवळ पोहोचलेलो असू.

समाजवाद आणि भांडवलवाद या दोन्ही व्यवस्थांमध्ये केंद्रीकरणावर भर दिला जातो. केंद्रीकरणाने समाजाचे मूलभूत प्रश्न पूर्णपणे सुटत नाहीत असा लोहीयांचा विश्वास होता.

एकेकाळी लोहीयांनी आशियाई समाजवादी मंच स्थापन करण्याचा प्रयत्न केला. कारण सोशॅलीस्ट इंटरनॅशनल आणि कम्युनिस्ट इंटरनॅशनल (म्हणजेच कॉमिन्टर्न) यासारख्या संघटना अटलांटीक किंवा सोव्हिएट गटातील गोऱ्या लोकांच्या अधिपत्याखाली होत्या. या पर्यायी विचारांच्या मालिकेतूनच सप्त क्रांतीची संकल्पना उदयाला आली.

# सप्त क्रांती

असमानता आणि अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी सप्त क्रांतीची संकल्पना मांडली. या सात क्षेत्रात क्रांती झाल्या समानता आणि न्याय प्रस्थापित होईल असे लोहीयांचे मत होते.

1. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठीची क्रांती
2. वर्णद्वेषाविरुद्ध क्रांती
3. जातीव्यवस्थेविरुद्धचा लढा
4. आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठीची उत्पादन क्षेत्रातील क्रांती
5. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीचा लढा
6. व्यक्ती स्वातंत्र्य जपण्यासाठीचा लढा
7. वाढत्या शस्त्रास्त्रांवर मर्यादा घालण्यासाठीचा लढा

या सात क्षेत्रात लोहीयांना क्रांती होणे अपेक्षित होते.

## स्त्री-पुरुष भेद

स्त्री-पुरुष भेद हा सर्व प्रश्नांचे मूळ आहे असे लोहीयांचे मत होते. हुंडा, खर्चिक पद्धतीने विवाह या सर्वांना त्यांचा विरोध होता. बाई सुशिक्षित असेल तर अधिक हुंडा द्यावा लागतो. या सर्व प्रकारच्या खर्चांना घाबरुन लोक मुलगीच नको या निर्णयाप्रत येतात असे लोहीयांचे मत होते. लोहीयांचा आई-वडीलांनी किंवा इतर वयस्कर नातेवाईकांनी मुलांचे विवाह ठरवण्याला विरोध होता. तरुण-तरुणींनी आपल्या पसंतीने आपल्या आयुष्याचा जोडीदार विचारपूर्वक निवडावा असे त्यांचे मत होते. अविवाहीत महिला आणि विधवांना मिळणाऱ्या वागणुकीचीही त्यांना चिंता होती. त्यातही खालच्या मानल्या गेलेल्या जातींमध्ये विधवांना बरी वागणुक मिळते परंतु वरिष्ठ मानल्या गेलेल्या जातींमध्ये विधवांची स्थिती फारच वाईट आहे याची जाणीव त्यांना होती.

लिंगभेदाचा प्रश्न सार्वत्रिक आहे परंतु भारतात जातीव्यवस्थेमुळे तो अधिक बिकट होतो. दलित जातीतील स्त्रियांना जात आणि लिंगभेदामधील अन्याय असे दुहेरी शोषण सहन करावे लागते. स्त्रीला अशुद्ध मानले जाते.

स्वयंपाक करणे, पाणी भरणे किंवा लाकडे गोळा करणे केवळ यामध्येच स्त्रियांना जखडून ठेवणे लोहीयांना मान्य नव्हते. पुरुषांना वाढल्यावर स्त्रियांनी जेवावे ही प्रथा सुद्धा त्यांना अमान्य होती. एखाद्या घरात जेवायला गेल्यावर स्वतः जेवण्याच्या आधी ते स्वयंपाक घरात जाऊन सर्वांना पुरेसे अन्न आहे की नाही याची खात्री करीत असत. तसेच सगळ्यांनी एकत्र जेवायला बसावे हा त्यांचा आग्रह असे.

त्यांनी स्त्रीयांसाठी वेगळ्या आरक्षणाचीही मागणी केली होती. समाजवादी पक्षामध्येही त्यांनी स्त्रियांच्या सहभागावर अधिक भर दिला. त्यांना नेतृत्वाची संधी दिली.

## वर्णद्वेषा विरुद्धची क्रांती

गोऱ्या रंगाच्या कातडीचा असलेला भयंकर आग्रह आणि त्यामुळे गोऱ्या नसलेल्या स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या यातना, गोऱ्या दिसण्यासाठी त्या करीत असलेले केविलवाणे प्रयत्न याची लोहीयांना प्रचंड चीड होती. गोऱ्यांनी आपल्यावर राज्य केले त्याचा हा परिणाम आहे असे त्यांना वाटत होते. जर आफ्रिकेतील देशांनी साम्राज्य गाजवले असते तर सौंदर्याचे मापदंड वेगळे ठरले असते असे ते म्हणत. भारतातील उच्च मानल्या गेलेल्या जाती खालच्या मानल्या गेलेल्या जातींपेक्षा थोड्या अधिक उजळ होत्या त्यामुळेही भारतात गोऱ्या रंगाला महत्त्व आले.

## लोहीयांचे जातीव्यवस्थेसंबंधीचे विचार

भारतीय समाजाच्या बहुतेक प्रश्नांना जातीव्यवस्था जबाबदार आहे असा लोहीयांचा ठाम विश्वास होता. संघर्ष आणि त्याची न्याय्य सोडवणूक यामुळे समाज पुढे सरकतो परंतु संघर्ष दडपला गेल्यास समाजात एकप्रकरचा साचलेपणा आणि घुसमट निर्माण होते. समाजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आणि सृजनशीलता उध्वस्त होते.

अंगभूत असमानता आणि क्रौर्य या आधारांवर वर्षानुवर्षे अस्तित्वात असलेल्या जातीव्यवस्थेमुळे शोषक आणि शोषित जाती अमानूष बनल्या आहेत. ही व्यवस्था अशाप्रकारे तयार करण्यात आली आहे की दलित जातीतील लोकांना सतत अपमानित जिणे जगावे लागत असले तरी आपण दुस-या निदान एका जातीपेक्षा तरी श्रेष्ठ आहोत याचे समाधान असते. अंतिमतः ही भावना भारत आणि भारतीयांसाठी आत्मघातकी ठरली आहे. बुद्धापासून लोहीयांपर्यंत जातीव्यवस्थेला विरोध करणा-यांची एक अखंड साखळी आहे. पण त्या सर्वांची दृष्टी आणि कार्यपद्धती वेगवेगळ्या होत्या. त्यांच्या जातीव्यवस्थेवर हल्ला करण्याच्या दिशाही वेगळ्या होत्या.

जातीव्यवस्था एकसंध समाजनिर्मीती होण्यापासून रोखते. समाजाचे तुकडे करुन अनेक उपसमाजांची निर्मीती होते. जातीव्यवस्थेवर आधारीत या उपसमाजात पुन्हा अनेक पोटजाती निर्माण होतात. पण हे उपसमाज स्वायत्त नसतात. ते एकमेकांवर अवलंबून असतात. जातीव्यवस्थेवर आधारित या समाजव्यवस्थांना एकत्र जोडण्यासाठी कर्मकांडांची विस्तृत व्यवस्था बनविण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक गटाला समाधानाची जाणीव होते.

बौद्धिक श्रमांचे श्रेष्ठत्व आणि शारिरिक श्रमांना तुच्छ लेखणे या दोन संकल्पनांवर आधारित जातीव्यवस्था आणि त्या आधारावरील भारतीय समाजाचे विभाजन हे अनैसर्गिक आणि चुकीच्या गृहीतांवर आधारित आहे. कोणतेही काम शुद्ध बौद्धिक किंवा शुद्ध शारिरिक असू शकत नाही. सर्वच बाबतीत मनाची आणि शरीराची एक भूमिका असते. ज्या देशाने पहिल्यांदा मन आणि शरीर यांच्या एकात्मतेची जाणिव करुन देणारा, म्हणजेच योगाचा विचार, मांडला, त्याच देशामध्ये अशी कृत्रिम श्रमविभागणी व्हावी हे आश्चर्यचकित करणारे आहे.

भारतीय जातीव्यवस्थेवर झालेल्या जवळ जवळ सर्वच हल्ल्यांना जातीव्यवस्था मोडून काढण्यात यश प्राप्त झाले नाही कारण ते सर्व कोणत्यातरी एकाच दिशेने झाले होते. बौद्ध, जैन, वीरशैव, चक्रधरांनी आणि नारायण गुरुंनी तात्विक दिशेने हल्ला केला, गुरु नानक, कबीर आणि नायकरांनी बुद्धीप्रामाण्यवादाच्या दृष्टीकोनातून, महात्मा फुल्यांनी ऐतिहासिक दृष्टीकोनातून, महात्मा गांधी आणि बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक आणि धार्मिक दृष्टीकोनातून हल्ला केला. भारतीय समाजात जातीव्यवस्था एवढी खोलवर रुतलेली आहे की केवळ एकाच दिशेने हल्ला करुन ती नष्ट होणार नाही हे लोहीया जाणून होते. तात्त्विक, धार्मिक, ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्नाच्या आणि सामाजिक अशा विविध अंगाने एकत्रित हल्ला झाल्यासच जातीव्यवस्था नष्ट होऊ शकते असा लोहीयांचा विश्वास होता. त्यांच्या अनेक अनुयायांनीच त्यांचा हा कार्यक्रम काही अल्पकालीन लाभांसाठी नाकारला.

अलिकडेच काही आंतरजातीय कार्यक्रम हाती घेतले जात आहेत परंतु ते जेवणावळींपर्यंतच सीमीत आहेत. आंतरजातीय विवाहही तसे फसवेच असतात कारण सहसा उच्च जातींमध्येच हे विवाह होतात. उच्च जाती आणि कनिष्ठ जाती असे विवाह होत नाहीत असे लोहीयांचे म्हणणे होते.

जातीयवादामुळेच परकीयांना भारतात शिरकाव करणे सहज शक्य झाले. येथील माणसे राष्ट्रापेक्षा जातीला अधिक महत्त्व देत राहीली. परकीयांना सत्ता मिळाली तरी चालेल, पण दुसऱ्या जातीच्या लोकांना नको, असा दृष्टीकोन काहीवेळा लोकांनी ठेवला.

जातीमुळे उच्च-नीचतेची भावना दृढ झाली. उच्च जातीच्या लोकांना आपण कनिष्ठ जातीच्या लोकांपेक्षा श्रेष्ठ असल्याचा भ्रम झाला. तो त्यांनी कनिष्ठ जातीच्या मनावर बिंबवला. त्यामुळे कनिष्ठ जातीच्या लोकांचा आत्मविश्वास विकसित झालाच नाही, ते सर्वार्थाने मागास राहीले. समाजवादी पक्षासहीत विविध पक्षांच्या नेतृत्वाचा आढवा घेतल्यास हे लक्षात येते की सर्व उच्च जातीचेच आहेत हे लोहीयांना त्यावेळी जाणवले होते. जातीव्यवस्था नष्ट केल्यामुळे खालच्या जातीच्या, भारताच्या लोकसंख्येच्या जवळपास ९० टक्के असलेल्या, लोकांचा विकास होईल. त्यामुळे शेवटी राष्ट्र बलवान होईल. म्हणजे जातीव्यवस्था नष्ट होण्यामध्ये, केवळ कनिष्ठ जातींचा नव्हे, सर्वांचाच फायदा आहे. जाती व्यवस्थेमुळे ९० टक्के जनता मानसिक दृष्ट्या अपंग झाली आहे. जात संधी मर्यादीत करते, संधी मर्यादीत झाल्यामुळे क्षमता कमी होते आणि क्षमता कमी झाल्यामुळे संधी आणखीन कमी होतात. जातीव्यवस्थेत काही मोजक्या लोकांनाच संधी मिळते आणि त्यांच्याच क्षमतांचा विकास होतो, बाकीचे मागे पडतात.

वर्ग म्हणजे खुली व्यवस्था असलेली जात अशी लोहीयांची धारणा होती.

## राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीची चळवळ

लोहीयांना अपेक्षित असलेली चौथी चळवळ राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीची होती. वसाहतवादाचा अंत हे तिचे उद्दीष्ट होते. वसाहतवादाचा अंत झाल्यानंतरही मागास राष्ट्रांना जागरुक राहावे लागेल कारण प्रत्यक्ष भूमी ताब्यात न घेता आर्थिक नियंत्रण करून एकप्रकारचा आर्थिक वसाहतवाद चालूच राहण्याची शक्यता आहे ही शंका त्यांना होती. ती बऱ्याच अंशी पुढे खरी ठरली.

## आर्थिक समानता, भांडवलवाद

भारताच्या आर्थिक समस्यांचे विशिष्ठ समाधान शोधू इच्छिणा-या राम मनोहर लोहीयांच्या मनात शोषक भांडवलवाद आणि युरोपकेंद्रीत मार्क्सवाद या दोन्ही विचारांबद्दल काही शंका होत्या. त्यांच्यामते समाजवाद म्हणजे समानता आणि सर्व लोकांसाठी समृद्धी. समानता आणि समृद्धी ही दोन्ही उद्दीष्टे एकत्रितपणे साध्य करणे हा त्यांच्यापुढील महत्त्वाचा प्रश्न होता. कार्ल मार्क्स चे काही प्रमाणात आकर्षण होते. परंतु मार्क्स संबंधी त्यांनी काही शंकाही उपस्थित केल्या होत्या.

एके काळी त्यांनी मार्क्सवादाला युरोपचे आशियाविरुद्धचे शस्त्र मानले होते. मार्क्सवाद एखाद्या आशियाई, दक्षिण अमेरिकन किंवा आफ्रिकी राष्ट्राचा अमेरिका किंवा युरोप सारखा वेगवान आर्थिक विकास घडवून आणु शकेल का हा त्यांच्या दृष्टीने त्या वेळेस महत्वाचा मुद्दा होता. त्यांनी चीनच्या विकासाची युरोप किंवा जपानच्या विकासाबरोबर आणि क्युबाच्या विकासाची तैवान बरोबर तुलना केली. वेगवान विकासाच्या स्पर्धेमध्ये मार्क्सवादी विचारसरणी मार्क्सवाद स्वीकारलेल्या देशांना भांडवलशाही राष्ट्रांबरोबर स्पर्धा करायला मदत करु शकेल का याबद्दल त्यांच्या मनात शंका होती.

कदाचित ते बरोबर होते. जरी आज चीनची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने उदयाला येणारी अर्थव्यवस्था ठरली आहे आणि अमेरिका आणि जपान नंतर तिसरी मोठी अर्थव्यवस्था ठरली आहे. चीनने जी प्रगती केली ती मार्क्स प्रेरीत साम्यवादी व्यवस्थेमुळे नाही. पोलीस राज्य, सत्ताधा-यांनी निश्चित केलेल्या उद्दीष्टांबाबत कोणत्याही मतभेदांना वाव नसणारी बाजारपेठेवर आधारीत अर्थव्यवस्था या दोन गोष्टींमुळे ही प्रगती शक्य झाली आहे.

मार्क्सवादाने मुख्यतः चीनमधील सरंजामशाही व्यवस्था मोडून काढण्यात आणि जगातील भांडवलशाही व्यवस्थेबरोबर राहू शकेल असा अत्यंत आक्रमक भांडवलशाही वर्ग निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावली. चीनचा भांडवलशाही आणि भांडवलशाहीचे आजचे संरक्षक या दोहोंवर इतका भक्कम विश्वास आहे की ते अमेरिकेच्या तिजोरीत अब्जावधी डॉलर्स ठेवतात.

लोहीयांच्या मनात भारत आणि चीन यासारख्या बिगर युरोपीय अर्थव्यवस्थांच्या क्षमतेबद्दल शंका आहे. युरोपीय राष्ट्रांची समृद्धी आशिया आणि दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांच्या दारिद्र्याशी संबंधीत आहे अशा योग्य गृहीतावर त्यांची शंका आधारित होती. म्हणजेच थोडक्यात भारतासारख्या देशांच्या शोषणामुळे युरोप-अमेरिकेत समृद्धी निर्माण झाली असे त्यांचे मत होते.

युरोपात छोटा भांडवलदार वर्ग आणि बहुसंख्य परंतु दरिद्री कामगार वर्ग अशा दोन वर्गांमध्ये भांडवलशाही व्यवस्थेतील समाजाचे ध्रुवीकरण झाले नाही. त्याउलट तेथे समृद्ध अर्थव्यवस्था विकसित झाली. कामगारांनीही सारख्या प्रमाणात ही समृद्धी वाटून घेतली. दारिद्र्य वसाहतींमधील अर्थव्यवस्थांच्या वाट्याला आले. वसाहतवाद आणि दारिद्र्य तिथे परस्परपूरक ठरले. एखाद्या सर्वसाधारण कामगाराला अमेरिकेत 10,000 रुपये, युरोपात 5000 रुपये तर भारतात केवळ 150 रुपये इतकेच भांडवल उपलब्ध होते या विरोधाभासाकडे लोहीयांनी लक्ष वेधले आहे.

लोहीया आज हयात असते तर अमेरिका, जर्मनी आणि जपान मधील बडे वाहन निर्माते प्रचंड भांडवल गुंतवून कारची अद्ययावत मॉडेल्स भारत आणि चीन मध्ये बनवत आहेत हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले असते. या विसंगतीची संगत कशी लावायची ? देशामध्ये सुरक्षित क्षेत्रात मोठ्या भांडवली अर्थव्यवस्था आहेत. आदिवासी आणि शेतमजुरांच्या ताब्यात असलेली भांडवली साधने जबरदस्तीने अत्यंत मामूली किंमत देऊन मोठ्या कंपन्यांकडे हस्तांतरीत केली जात आहेत. चीनच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्ठ्य असलेली विशेष आर्थिक क्षेत्रे शेकडोंच्या संख्येने आता भारतातही उभी राहत आहेत. कंपन्यांसाठी ते स्वर्ग आहेत कारण या क्षेत्रांमध्ये त्यांना सामान्य माणसांच्या सुरक्षेसाठी बनविलेला कोणताच कायदा पाळावा लागत नाही.

वेगवेगळे बहाणे करून जमीन ताब्यात घेतली जात आहे. खाणकामासाठी, उद्योगांसाठी, माहिती तंत्रज्ञानाच्या कंपन्यांची संकुले उभी करण्यासाठी आणि शेवटी विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी. 1894 च्या जमीनधारणा कायद्यातील तरतुदींप्रमाणे हे केले जात आहे. या कायद्यानुसार सामाजिक हीतासाठी कोणतीही खाजगी मालमत्ता ताब्यात घेण्याची मुभा सरकारला देण्यात आली आहे. कृषीआधारित अर्थव्यवस्थेमध्ये जमीन हे रोजीरोटीचे प्राथमिक साधन असते तेच सामान्य माणसांकडून जबरदस्तीने काढून घेऊन मोठ्या कंपन्यांना दिले जाते. त्यामुळे सामान्यांचे जीवन उद्धवस्त होते आणि मोठ्या प्रमाणावर लोक विस्थापित होतात.

देशाच्या विविध भागात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या आहेत. समाजातील एखादा घटक दरिद्री बनण्याचाच हा परिणाम आहे. लोहीयांनी अशा भयंकर अंतर्गत वसाहतवादाचा विचारही केला नसेल, त्यांनी त्याला मान्यताही दिली नसती. ते औद्योगिकरणाचा मानवी मार्ग अवलंबण्याच्या विचाराचे होते. त्यांनी छोट्या यंत्रांवर आधारित तंत्रज्ञानाचा विचार केला. ही छोटी यंत्रे कमीतकमी भांडवली गुंतवणुकीमध्ये उपलब्ध होतील आणि हाताळणाऱ्या लोकांना समजायला सोपी अशी असतील.

पण लवकरच त्यांना त्यांच्या दुसऱ्या विचाराची शंका यायला लागली. कारण ट्रांझिस्टर हे छोटे यंत्र असते पण ते समजायला बिलकुल सोपे नसते. छोट्या यंत्रांचे तंत्रज्ञान संरक्षण आणि अवकाश अशा क्षेत्रांमध्ये उपयोगी पडेल काय याबद्दलही त्यांना शंका येऊ लागली. 1962 च्या चीनी आक्रमणानंतर त्यांना भारताच्या संरक्षणाची विशेष काळजी वाटू लागली. याकरिता आजपर्यंत तरी कोणताही अहिंसक आणि व्यवहार्य पर्याय उपलब्ध नाही. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर राष्ट्रामध्ये भावनिक एकात्मता निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर त्यांनी आपले लक्ष केंद्रीत केले. त्यांना असे वाटत होते की दिल्लीमधील राज्यकर्त्यांनी यामुद्द्याकडे दुर्लक्ष केले आहे. पण त्यामुळे तंत्रज्ञानाचा प्रश्न अनुत्तरीतच राहीला.

छोटे यंत्र कसे असेल याची कोणतीही स्पष्ट कल्पना मांडण्यापूर्वीच लोहीयांचा मृत्यू झाला परंतु त्याचे स्वरुप आणि उपयोगिता यासंबंधीचा शोध चालू राहीला पाहिजे. सध्याचा औद्योगिक समाज वेगाने आपल्या अंताकडे जात आहे. तंत्रज्ञान हे मूल्यविरहीत आहे ही सार्वत्रिक समजूत चूकीची आहे. आधुनिक तंत्रज्ञान भांडवलशाहीबरोबर वाढले आहे आणि भांडवलशाहीच्या चौकटीतच त्याला आकार मिळत गेला आहे. भांडवलशाहीच्या अनुभवाच्या आधारावर गरज ही शोधाची जननी आहे ही जुनी म्हण आता उलटी करावी लागेल. आज मोठ्या प्रमाणात संशोधन प्रकल्प नवीन गरजा निर्माण करण्यासाठी राबवले जातात. भांडवली उद्योग सतत काही नवीन उत्पादने निर्माण करीत असतात. मोबाईल फोन हे याचे उत्तम उदाहरण आहे. लोकांना त्याची गरज कधीच वाटली नव्हती. पण आता ती प्रत्येकाची गरज बनली आहे. फोटोग्राफी, संगीत, संगणकाशी जोडून घेणे अशी नवनवीन सुविधा रोजच्या रोज त्यामध्ये तयार केल्या जात आहेत. नव्या सुविधांमुळे लोकांमध्ये फोन विकत घेण्याची इच्छा बळावते. हे फक्त एक उदाहरण आहे, पण अशी अगणित उदाहरणे आपल्या अवतीभोवती दिसतील.

भांडवलशाही ही नफ्याच्या प्रेरणेवर आधारित व्यवस्था आहे. बाजारात खपलेल्या मालाच्या प्रमाणात भांडवलदारांचा नफा वाढतो. जेवढा मालाचा खप जास्त तेवढा नफा जास्त. पण मग एक प्रश्न उपस्थित होतो. अधिक वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी सर्व भांडवलदारांना अधिक कच्चा माल आणि उर्जेची अधिक साधने लागतात. (कोळसा, तेल, जलविद्युत, अणु ऊर्जा आणि, नद्या, समुद्राच्या लाटा, वारा, सूर्यप्रकाश इत्यादींपासून ऊर्जा मिळविण्याची साधने.) ही सर्व साधने मर्यादीत प्रमाणात उपलब्ध आहेत. आपली पृथ्वी मर्यादीत आहे. म्हणून जितक्या वेगाने अर्थव्यवस्था वाढतील तितके आपण ज्यादिवशी पुढे जाण्यासाठी आपल्याकडे काहीच नसेल अशा दिवसाच्या जवळ जावू.

केवळ इतकेच नाही, आधुनिक औद्योगिक उत्पादने आणि त्यांचा उपभोग घेण्याच्या पद्धती घातक प्रदुषके निर्माण करतात, त्यामुळे पर्यावरणाचे गंभीर प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांचे व्यवस्थापन करणे कठीण होत चालले आहे. याचा अर्थ असा होतो की भांडवलशाही किंवा त्यासारखी उपभोग वाढविणारी व्यवस्था आपल्याला अंताकडे घेऊन जाते.

गांधी या प्रश्नातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवतात. लोहीयांना पश्चिमेचे अजस्त्र यंत्रांचे तंत्रज्ञान आणि गांधींची माणसांच्या गरजा मर्यादीत करणारी खादीवर आधारित अर्थव्यवस्था या दोन टोकांमध्ये तडजोड हवी होती. या समस्येचे समाधान कदाचित आपल्या गरजा मर्यादीत करण्यामध्ये आहे. यामध्ये स्वयंपूर्ण खेड्यांची व्यवस्थाही समाविष्ट आहे. लोहीयांनी चार खांबांवर आधारित राज्यव्यवस्था सुचवली आहे. चार खांबांवर आधारित राज्यामध्ये अंतिमतः सत्तेचे केंद्रीकरण होते असे प्रत्यक्षात अनुभवाला येते. लोहीयांनी या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही परंतु त्यांनी निदान या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधले याच श्रेय त्यांना दिले पाहिजे.

## व्यक्ती स्वातंत्र्य जपण्यासाठीची क्रांती

लोहीयांच्या मते व्यक्तीचे स्वातंत्र्य कमी होत आहे. मोठ्या कंपन्या, सरकार आणि इतर मोठ्या संघटना त्यावर आक्रमण करीत आहेत. भांडवलवादी आणि साम्यवादी अशा दोन्ही व्यवस्थांमध्ये हा धोका आहे. व्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी विशेष प्रयत्न वेळीच केले पाहिजेत असे लोहीयांचे मत होते.

## शस्त्रास्त्रांच्या वाढीविरोधात क्रांती

प्रत्येक मोठे राष्ट्र शस्त्रास्त्रांचा साठा करण्याच्या मागे लागले आहे.  ही शस्त्रास्त्रे ज्या नेत्यांच्या, सरकारच्या किंवा अतिरेकी संघटनांच्या हाती असतील त्यांच्याकडे अवाजवी बळ असेल.  त्या आधारावर ते मनमानी कारभार करू शकतील आपल्याला हवे तसे जग वळवतील.  हा सगळा विनाश टाळण्यासाठी मुळात शस्त्रास्त्रे वाढू देता उपयोगी नाहीत.

## भाषा

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळातील भारतातील सर्व राज्यकर्त्यांची भाषाविषयक धोरणे जातीव्यवस्था दृढ करणारी शस्त्रेच होती असे लोहीयांचे मत होते.  मध्ययुगात फारसीचा आणि सध्या इंग्रजीचा वापर कनिष्ठ जातीच्या आणि उच्च जातीमधील गरीबांना दाबून टाकण्यासाठी होतो.  इंग्रजीचा वापर ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी नव्हे गरीबांमध्ये ज्ञानाचा प्रसार होऊ नये म्हणून केला जातो.  एकच भाषा सर्व ज्ञानाचा स्त्रोत कशी होऊ शकते?  भाषेच्या अशा चूकीच्या वापरामुळे समाजात अभिजनवाद निर्माण होतो.  सामान्य जनतेपेक्षा वेगळा दिसण्याची अपेक्षा करणारा, वेगळ्या भाषेत बोलणारा आणि काम करणारा, वर्ग अशा समाजात निर्माण होतो.  असा वर्ग अन्नही वेगळ्या प्रकारचे खातो आणि आता वेगळ्या प्रकारचे पाणीही वापरतो.  भाषेचा प्रश्न हा वस्तुतः जातीच्या प्रश्नाचा भाग आहे.

## जमातवाद

हिंदू-मुसलमानांमधील तणाव वाढवून पाकिस्तानच्या निर्मीतीसाठी ब्रिटीशांनी त्याचा वापर केला हे लक्षात आल्यावर लोहीयांनी शिस्तबद्धरीतीने लिहिण्याचा प्रयत्न केला.   लोहीयांचा असा विश्वास होता की ब्रिटीशांनी पाकिस्तानची निर्मीती हिंदु आणि मुसलमानांमधील तणाव वाढावा म्हणूनच केली आहे आणि पाकिस्तानच्या निर्मीतीमुळे हिंदु-मुस्लीम प्रश्न सुटणार नाही.  दोन्ही समाजांनी मध्ययुगातील काही घटनांचा चुकीचा अर्थ लावला आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये तणाव निर्माण झाला असे लोहीयांचे मत होते.  परकीय मुस्लीम लष्करांनी केवळ हिंदू किंवा बौद्ध संस्थानाचा पाडाव केला असे नाही तर स्थानिक मुस्लीम राज्यांचाही पाडाव केला.  उदा. तुर्कांनी हिंदु, बौद्ध आणि अफगाणी (मुस्लीम) साम्राज्ये जिंकली.  नंतर बाबराच्या नेतृत्वाखालील मुघलांनी जसा राजपूतान्यातील महाराणा संगाचा पराभव केला तसा पानिपतच्या पहिल्या युद्धात अफगाणांचाही पराभव केला.